# जिल्हा परिषद निवडणूक नव्हे ; नेत्यांची परीक्षाच !


साप्ताहिक दिव्य

# वास्तव

संपादक - सचिन पवार

बीड (महाराष्ट्र) | वर्ष २ | अंक ७ | सोमवार, दि.२१ जुलै २०२५ | टिसी-एमए एच आर ५२६७८ | किंमत २ रू | पाने ४

Beed (Maharashtra) | Year 2 | Issue -7 | Monday 21 July 2025 | TC: MAHMAR52678 | Price 2 | Pages 4



महादेव मुंडेंसोबत भांडण करणारी 'ती' व्यक्ती कोण? पान ३

पान २ आता रेल्वे इंजिनांची निर्यात


## अकरावी प्रवेश प्रक्रिया लांबल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम !

### शिक्षण विभागाच्या दिरंगाई बद्दल पालकांमधून नाराजी



■ बीड / प्रतिनिधी

अकरावीची प्रवेश प्रक्रिया लांबल्यामुळे जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण विभागाच्या दिरंगाईबद्दल पालकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. दहावीचा निकाल लागून बराच का लोटला तरी कोणत्या विद्यालयात प्रवेश मिळणार आणि विज्ञान वाणिज्य की कला शाखा निवडायची याबाबत विद्यार्थ्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. प्रवेश निश्चित नसल्याने त्यांना अभ्यासाला सुरुवात करता येत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा आणि माहितीच्या अभावामुळे अधिक अडचणींना तोंड द्यावे लागतात आणि भविष्याची चिंता विद्यार्थ्यांवर मोठा मानसिकता निर्माण करत आहे. मुलांच्या भविष्याच्या चिंतेत पालकही हवालदिल झाले आहेत. प्रवेशासाठी विविध महाविद्यालयामध्ये चौकशी करण्यासाठी आणि माहिती मिळवण्यासाठी त्यांचा वेळ वाया जात आहे. प्रवेशाची रक्कम आणि इतर खचार्ची आर्थिक नियोजन


⏩ पान ३ वर


### नेत्यांनी व उमेदवारांना जिल्हापरिषदेच्या कामांची यादी द्यावी

■ येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीतील उमेदवार आणि ते मंडळींनी प्रचारासाठी येताना जिल्हा परिषदेतून कोणते कामे सर्वसामान्य जनतेच्या हिताची असतात आणि पंचायत समितीतून जनतेची कोणती हक्काची कामे असतात हे घेऊन यावे अन्यथा मत मागण्यासाठी येऊ नये असेही बोलले जात आहे . जिल्हा परिषद उमेदवाराचं काम आणि पंचायत समिती उमेदवाराचे काम काय असतं हेच जनतेला आधी सांगावं नंतर मत मागाव असेही सर्वसामान्य जनतेच्या चर्चा समोर येत आहेत ...

# जिल्हा परिषद निवडणुकीत नेत्यांनी अन् उमेदवाराने खोटं बोलायचं नाही !






### जनतेच शस्त्र सोशल मीडिया !

■ नेते उमेदवार निवडणुकीत जे आश्वासन देतात ते पूर्ण करतात की नाही हे दाखवण्यासाठी जनतेच्या हातामध्ये आता सोशल मीडिया आहे . सोशल मीडियाच्या माध्यमातून नेत्यांनी उमेदवारांनी केलेली फसवणूक उघडपणे सोशल मीडियातून दाखवली जाईल त्यामुळे उमेदवार आणि नेत्यांनी आश्वासन दिले आणि पूर्ण केले असतील तरच निवडणुकीत उतरावे अन्यथा सोशल मीडियातून होणारे धारदार वार झेलण्याची तयारी ठेवावी असेही आव्हान सर्वसामान्य जनता करत आहे ...

### निवडणुकीत खोटं बोलायचं नाही


■ सोशल मीडिया हे सर्वसामान्य जनतेचे शस्त्र झाल आहे . येणाऱ्या निवडणुकीत आता खोटं बोलायचं नाही असंच बोललं जात आहे . जो उमेदवार, नेता खोटं बोलेल त्याचा सोशल मीडियातून करेक्ट कार्यक्रम केला जाईल असेही सर्वसामान्य जनतेतून चर्चा येत आहे ..

### 2017 पासून जनतेने केला लेखाजोखा आता पुढे काय जनता ठरवणार

### जिल्हा परिषद अन् पंचायत समितमध्ये जनतेच्या हक्काचं काय ? त्याची यादी आणावी ; मगच मतदान !

■ बीड / सचिन पवार

बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता आता 2017 पासून जिल्हा परिषद अंतर्गत केलेल्या कामाचा लेखाजोखा करणार आहे . येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत नेत्यांची परीक्षा घेतली जाईल असाच वातावरण दिसणार आहे . 17 पासून आत्तापर्यंत केलेल्या कामाचा लेखाजो का आणि भविष्यात काम करणारा उमेदवार कसा हवा याचा अहवाल जनतेनेच तयार केला आहे . आता निवडणुकीला सामोरे जाताना उमेदवार आणि ही आपली पात्रता समजून उतरावे असं जनतेने आव्हान केले आहे ...



■ सोशल मीडियाचा आता मोठ्या प्रमाणात वापर होत आहे . नेत्यांनी दिलेले आश्वासन ते पूर्ण झाले की नाही हे लगेच सोशल मीडियावर येत आहेत . नेत्यांनी जर फसवणूक केली असेल तर त्याला उत्तर सोशल मीडियावर लगेच दिल्या जात आहे . त्यामुळे निवडणुकीत उतरताना उमेदवारांनी ही सगळा विचार करावा आणि मगच निवडणुकीच्या रिंगणात उतरावं उगच उचलायची जीभ आणि लावायची टाळ्याला नको त्यामुळे जनता ही आव्हान करत आहे निवडणुकीच्या रिंगणात उतरताना उमेदवाराने स्वत :ची पात्रता तपासावी आणि नंतरच निवडणुकीच्या रिंगणात उतरावे अन्यथा सोशल मीडियावर भांडाफोड केला जाईल असे बोलले जात आहे ... सर्वसामान्य जनतेने आता नेत्यांची परीक्षा घेण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करणार असल्याचे बोलला जात आहे . सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्काचे व्यासपीठ म्हणजेच सोशल मीडिया याच मीडियाचा वापर करून जनतेला स्वत :चे अस्तित्व टिकायचे आहे . . येणाऱ्या निवडणुकीत उमेदवार आणि नेत्यांसाठी कठीण काळ आहे हे मात्र नक्की ...

## दिपक घुमरे यांना मराठवाडा आयकॉन सन्मान पुरस्कार

■ बीड / प्रतिनिधी

बीड येथील नामांकित शिक्षण क्षेत्रातील व्यक्तिमत्व दिपक घुमरे यांना नवभारत मराठवाडा प्रेस, टाइम्स च्या वतीने बीड जिल्ह्यातील शिक्षण, सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात व विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारे व्यक्तिमत्व दिपक घुमरे यांना नवभारत ने मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित केले असून दिनांक 20 जुलै रोजी सकाळी 10:30 वाजता संभाजीनगर येथे हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे समारंभात गौरविण्यात येणार असून विविध मान्यवरांच्या हस्ते नवभारत टाइम्स च्या वतीने दिपक घुमरे यांना सन्मानित करण्यात येत आहे शिक्षण व सामाजिक क्षेत्रात विविध स्थरावर उत्तम कामगिरी केल्या बद्दल त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे दिपक घुमरे हे विविध शैक्षणिक, सामाजिक संस्थाच्या माध्यमातून कार्य करत असून वेगवेगळ्या संस्थाच्या माध्यमातून शैक्षणिक चळवळ उभीकेली आहे, वेगवेगळे सामाजिक संस्कृतिक कार्य संस्थाच्या माद्यमातून करत आहेत.

## अंमळनेर गटात तुतारीचा आवाज निघणार !

### सुग्रीव पवार, मेजर शिवाजी पवार, अतुल शेलार रिंगणात उतरण्याची शक्यता !

■ पाटोदा / प्रतिनिधी

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक येणाऱ्या काही दिवसातच निवडणूक होईल अशी चित्र दिसत आहे. अमळनेर जिल्हा परिषद पंचायत समिती गटात तुतारी कडून युवा नेते सुग्रीव पवार, मेजर शिवाजी पवार, सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार हे रिंगणात उतरण्याची शक्यता आहे..

अमळनेर जिल्हा परिषद गट हा शरदचंद्रजी पवार साहेब यांना मानणारा गट मानला जातो या गटामध्ये पवार साहेबांच्या विचाराचे म्हणजेच पुरोगामी विचाराचे लोक मोठ्या प्रमाणात आहेत त्यामुळे वैचारिक दृष्ट्या आणि जनतेच्या हिताचा विचार करणारा उमेदवार या गटात निवडून येईल आणि अशा पद्धतीनेच उमेदवार जनतेला अपेक्षित आहे त्यामुळे तूतरी कडून सामाजिक कार्यकर्ते आणि चळवळीतील



कार्यकर्ता अतुल शेलार, युवा नेते सुग्रीव पवार, मेजर शिवाजी पवार हे रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक अजूनही उमेदवार पुढे येऊ शकतात परंतु सध्या तरी यांचेच नाव चर्चेत आहे. मग जिल्हा परिषद असो की पंचायत समिती असो पक्ष जो आदेश देईल त्या ठिकाणी लढायला तिघेही तयार आहेत अजूनही नावे पुढे येऊ शकतात.. काही झालं तरी अमळनेर जिल्हा परिषद गटात तुतारी जोरात वाजेल असाच अंदाज वर्तवला जात आहे...

### वैचारिक उमेदवाराची आवश्यकता

■ जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये अमळनेर जिल्हा परिषद पंचायत समिती गटामध्ये वैचारिक उमेदवार असावा अशी चर्चा सुरू आहे . युवा नेते सुग्रीव पवार, मेजर शिवाजी पवार, सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार हे या चौकटीत परफेक्ट बसतात या अनुषंगाने जनतेकडून यांना निवडणुकीत उतरण्याची मागणी होत आहे . .

### विकासाची दूरदृष्टी, विचार, परिपक्व उमेदवार हवा

■ सर्वसामान्य जनता म्हणत आहे विकासाची दूरदृष्टी असलेला आणि विचार आणि परिपक्व असलेला उमेदवार आम्हाला हवा आहे . भ्रष्टाचाराला आळा आणि सामाजिक प्रबोधन करत विचाराची दूरदृष्टी घेऊन चलणारा उमेदवार जर मिळाला तर जिल्हा परिषदेमधून येणारे कामे जनतेपर्यंत पोचतील आणि विकासाला चालना मिळेल म्हणूनच विकासाची दूरदृष्टी विचार आणि परिपक्व उमेदवार हवा आहे अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे .

## ठाकरे बंधू एकत्रच, कुणाला काय प्रॉब्लेम ?



### मी आणि राज एकत्र आल्यानं अनेकांना पोटदुखी : उद्धव ठाकरे

■ मुंबई / प्रतिनिधी

आम्ही दोघे भाऊ एकत्र आल्याने कुणाला काही प्रॉब्लेम आहे काय? त्यांच्या पोटदुख्या त्यांनी सांभाळाव्यात. आम्ही दोघे मिळून महाराष्ट्राचे स्वप्न साकार करू. योग्य वेळी योग्य निर्णय घेऊ असं सांगत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विरोधकांवर प्रहार केला. या मुलाखतीत उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंसोबत एकत्र येण्यावर अधिक स्पष्टपणे भाष्य केले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, मराठी माणसांची एकजूट अभेद्य आहे. हिंदी सक्तीच्या निमित्ताने भाजपा महाराष्ट्र पेटवण्याचा प्रयत्न करत आहे पण तसे घडणार नाही. आम्ही कोणत्याही भाषेचा द्वेष करत नाही. पण कोणत्याही भाषेची सक्ती मराठी माणूस सहन करणार नाही. मी आणि राज एकत्र येण्यामुळे केवळ मराठी माणसांनाच नाही तर इतर भाषिकांनासुद्धा अगदी मुस्लीम बांधवांनाही आनंद झाला आहे. कोणाला पोटशूळ झाला असेल तर मी त्याकडे दुर्लक्ष करतो असं त्यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्राच्या मनात जे काही ते साकार होईल. २० वर्षांनी आम्ही एकत्र आलोय. प्रत्येक ठिकाणी राजकारण आणले पाहिजे असे नाही. मराठी भाषेसाठी, महाराष्ट्र धमार्साठी आणि महाराष्ट्रासाठी जे जे काही करण्याची आवश्यकता आहे ते मी करेन. यापुढे चर्चा होत राहील. पहिल्यांदा २० वर्षांनी एकत्र आलोय. आमची थेट चर्चा झाली तर अडचण काय...बाकी लपूनछपून भेटतात आम्ही उघड भेटू. मी आतासुद्धा फोन उचलून राजला फोन करू शकतो. तो मला फोन करू शकतो. आम्ही आता भेटू शकतो असंही उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंबाबत सांगितले. दरम्यान, मराठी माणूस हा आततायीपणा करणारा नाही. मराठी माणूस हा विघ्नसंतोषी नाही. मराठी माणूस हा इतर वेळेला मी बरं आणि माझं काम बरे असतो. कोणावरही अन्याय करत नाही. हाच मराठी माणूस जर त्याच्यावर अन्याय झाला तर सहनही करत नाही. आता सहनशीलतेचा कडेलोट व्हायला लागला म्हणूनच मराठी माणूस पिसाळलाय. जसा संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या वेळेला तो पेटला होता तसाच तो आता पेटलेला आहे. कारण किती काळ हे सहन करायचं, आमची चूक काय असं त्याला वाटू लागलंय असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

### ज्ञानेश्वरी मुंडे पोलिसांवर संतापल्या ; मुख्यमंत्र्यांना भेटणार

# गुन्हा कशाला ; माझा एन्काऊंटर करा ; ज्ञानेश्वरी मुंडे

■ बीड : प्रतिनिधी

परळी येथील मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी दोन दिवसांपूर्वी पोलिस अधीक्षक कार्यालयात विषारी द्रव प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी त्यांच्याविरोधात बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हे समजताच त्या पोलिसांवर संतापल्या. माज्यावर १०० गुन्हे दाखल झाले तरी मागे हटणार नाही. पोलिसांनी गुन्हे दाखल करण्याऐवजी माझे एन्काउंटर करावे, म्हणजे महादेव मुंडेची केस बंद होईल, संतप्त प्रतिक्रिया माध्यमांना शुक्रवारी दिली.

महादेव मुंडे खून प्रकरणाला २० महिने उलटले आहेत. तरीही बीड पोलिसांना अद्याप आरोपी कोण, हे समजले नाही. त्यामुळेच संतापलेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आत्मदहनाचा इशारा देत पोलिस



अधीक्षक नवनीत काँवत यांची भेट घेतली होती. भेटून परतताना ज्ञानेश्वरी यांनी विषारी द्रव प्राशन केले होते. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. दोन दिवस उपचार घेतल्यानंतर शुक्रवारी दुपारी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.

### यंत्रणेचा खर्च होणार वसूल

■ ज्ञानेश्वरी मुंडे यांच्यासाठी पोलिस, आरोग्य, अग्निशमन, महसूल असे विविध विभाग पोलिस अधीक्षक कार्यालयात १७ जुलै रोजी तैनात होते . त्यांचे समाधान केल्यानंतरही त्यांनी टोकाचे पाऊल उचलले . त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला . एवढेच नव्हे तर या ठिकाणी बंदोबस्तावर असलेल्या सर्व यंत्रणेचा खर्चही त्यांच्याकडून वसूल केला जाणार आहे . पोलिसांकडून तशी तजवीज ठेवल्याचे सूत्रांनी सांगितले .

### युट्यूबवर पाहून बनविले विषारी द्रव

■ ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या कुटुंबाने आणलेल्या पेट्रोलच्या बाटल्या पोलिसांनी गेटच्या बाहेरच काढल्या . परंतु परत जाताना ज्ञानेश्वरी यांनी एका छोट्या बाटलीत विषारी द्रव आणून ते प्राशन करण्याचा प्रयत्न केला . त्यात उंदीर मारण्याचे विष होते . पावडर आणि पाणी मिसळून ते एका छोट्या बाटलीत ज्ञानेश्वरी यांनी आणले . हे त्यांनी यूट्यूबवर पाहिले होते . संयम सुटल्यानंतर त्यांनी ते प्राशन करण्याचा प्रयत्न केला, असा दावा ज्ञानेश्वरी यांचे बंधू सतीश फड यांनी केला आहे .

### काय म्हणाल्या ज्ञानेश्वरी मुंडे

■ आतापर्यंत पोलिस अधीक्षकांची चार वेळा भेट घेतली . त्यांच्याकडून प्रयत्न करतो, असे अश्वासन दिले जात होते . परंतु वारंवार तोच शब्द दिल्याने आपण हे टोकाचे पाऊल उचलले . पोलिसांनी मला न्याय देण्याऐवजी माज्यावरच गुन्हा दाखल केला आहे . पीडितांवर हा अन्याय आहे . पण, कितीही गुन्हे दाखल झाले तरी मागे हटणार नाही . आणखी महिनाभर थांबून पुन्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातच आत्मदहन करणार, असा इशारा ज्ञानेश्वरी यांनी दिला . तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वेळ मागितली आहे . तीन दिवसांत आपण त्यांना भेटणार आहोत . त्यांनी किमान १० मिनिटे तरी वेळ द्यावा . त्यासाठी त्यांच्या बंगल्यावर जाऊ, असेही त्यांनी सांगितले .

# महाराष्ट्र राज्याला साथीच्या आजाराचा विळखा

दरवर्षी जून ते सप्टेंबर महिन्यात पाऊस पडतोच, फरक इतकाच आहे की कोणत्या वर्षी तो कमी पडतो, तर कोणत्या वर्षी तो जास्त पडतो. पण पावसाळा कालावधीत एकच साम्य आहे आणि ते म्हणजे पाऊस पडायला लागल्यावर काही दिवसांतच राज्याच्या शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांमध्ये साथीच्या आजारांचा उद्रेक होत असतो. या कालावधीत खासगी दवाखाने, रुग्णालये, शासकीय नागरी आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांची वाढती गर्दी पाहून आजारांचा उद्रेक किती वाढला आहे, याची प्रचिती येते. ताप, हिवताप, मलेरिया, डेंग्यू, चिकगुणिया, स्वाईन फ्ल्यू या साथीच्या आजारांच्या रुग्णांचा वाढता आलेख याच कालावधीत असतो. खासगी दवाखाने, रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची यादी व संख्या शासकीय यंत्रणेकडे पुरेशी जात नसल्याने खरी आकडेवारी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यात सध्या खोकला, कफ, घसादुःखी यांसह कोरोनाचे रुग्ण सापडू लागल्याने देशाच्या आर्थिक राजधानीला आजारांचा विळखा बसल्याचे पाहावयास मिळत आहे. सर्दीपासून सुरू झालेला आजार तापापासून मलेरिया-कोरोनापर्यंत पोहोचण्यास फारसा वेळ लागत नसल्याने मुंबईत साथीच्या आजारांच्या वाढत्या आलेखाचे गांभीर्य वेळीच ओळखणे आवश्यक आहे. पावसाळ्यात साथीच्या आजारांचा दरवर्षी उद्रेक होतो, हे गृहीत धरून मुंबईसह सभोवतालच्या महापालिका, नगरपालिका, ग्रामीण भागातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करत असतात. शहरी भागात मलेरिया व डेंग्यूचा आजार हा डासांमुळेच होत असल्याने डास नियंत्रणासाठी धुरीकरणावर विशेष भर देण्यात येतो. पूर्वीच्या काळी साथीच्या आजारांचा उद्रेक हा प्राधान्याने शहरी भागातच होतो.

ग्रामीण भागामध्ये त्याचे प्रमाण नगण्य असायचे. पण अलीकडच्या काळात साथीच्या आजारांनी ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर शिरकाव केल्याने शहरी व ग्रामीण असा कोणताही भेदभाव आता शिल्लक राहिला नाही. डासांपाठोपाठ पावसाळ्यात तलावातून शहरी व ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांतून दूषित पाणी येत असल्यानेही साथीच्या आजाराला पोषक वातावरण उपलब्ध होते. तलावक्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे चिखल व गाळाचे पाणीही जलवाहिन्यांतून आपल्या घरामध्ये येते. यामुळे कधी पिवळसर, कधी तांबूस, कधी लालसर रंगाचे पाणी दिसून येते. त्यातच कोठे जलवाहिन्या फुटल्यास तेथील माती, चिखलाचाही समावेश त्यात होत असतो. दूषित पाण्याची समस्या अलीकडच्या काळात वाढीस लागल्याने साथीच्या आजारांचा उद्रेक होऊ लागला आहे. राज्याला साथीच्या आजाराचा विळखा पडत असून, गेल्या साडेपाच महिन्यांत मलेरियाचे ४४७१ रुग्ण तर डेंग्यूचे रुग्ण २०३१ आढळले आहेत. तर चिकनगुनियाचे ९०० रुग्ण आढळले. शहरी भागातील मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनियाचे सर्वाधिक रुग्ण मुंबई महापालिका क्षेत्रात आहेत. मुंबईसोबत ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल-उरण, भाईंदर परिसरातही साथीच्या आजारांचा उद्रेक सध्या झाला आहे. ज्या ठिकाणी खाडी किनारा आहे, तेथे डासांच्या उद्रेकास पोषक वातावरण मिळाल्याने साथीच्या आजारांना पोषक वातावरण तयार होत असते. गलिच्छपणा, साचलेले पाणी, तुंबलेली गटारे-नाले या ठिकाणीही डासांचा फैलाव झालेला असतो. साथीच्या आजारांमध्ये अन्य आजारांच्या तुलनेत मलेरियाचे प्रमाण अधिक असते.

यंदा राज्यात मान्सून महिनाभर आधी दाखल झाल्याने साथीच्या रुग्णांमध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. राज्यातील जिल्ह्यामध्ये गडचिरोलीमध्ये ११८०, रायगडमध्ये २११, गोंदियात २८ रुग्ण आढळले आहेत. महापालिकांचा विचार करता मुंबई २३१४, पनवेलमध्ये २१६, ठाण्यात १२८ रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूचे पालघरमध्ये १३३, पुणे १२८, अकोला ११९, सिंधुदुर्ग ६६ रुग्ण आढळले. महापालिकांमध्ये मुंबईनंतर नाशिक ३९५, अकोला १३९ , नाशिक १३२, ठाणे ६३ रुग्ण आढळले. राज्यामध्ये मलेरियाचे रुग्ण सामान्यतः पावसाळ्याच्या म्हणजेच जुलै ते ऑक्टोबर तसेच डेंग्यूचे रुग्ण सामान्यतः ऑगस्ट ते नोव्हेंबर या महिन्यांत वाढतात. मुख्य कारण म्हणजे तापमान, आर्द्रता आणि अधूनमधून पडणारा पाऊस यांसारख्या हवामानाच्या परिस्थितीमुळे डासांची पैदास होत असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले होते, मात्र यंदा जानेवारीपासून रुग्ण आढळत आहेत. राज्यात चिकनगुनियाच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याने महाराष्ट्राच्या आरोग्य विभागावर कमालीचा ताण पडला आहे. राज्यात ९०० चिकनगुनियाचे रुग्ण आढळले. पण गेल्या वर्षीच्या तुलनेत रुग्णसंख्या वाढल्याचे दिसून येत आहे. पुणे १०४, अकोला ८५, पालघर ६९, सिंधुदुर्ग ४४, महापालिकानिहाय मुंबई ११९, अकोला १०१, सांगली मिरज २४ रुग्ण आढळून आले आहेत. राज्यात लेप्टोचे एकूण १२१ रुग्ण आढळले आहेत, तर स्क्रब टायफसचे १८ आणि जपानी तापाचे ३ रुग्ण आढळले आहेत. स्वाइन फ्लूचे एकूण २०४ रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला आहे. मुंबईत सर्वाधिक ४२ रुग्ण आढळले आहेत. त्यानंतर सोलापूरमध्ये ३६, पुण्यात ३१, नागपूरमध्ये २७, ठाण्यात २१, छत्रपती संभाजीनगरमध्ये १९, कोल्हापूरमध्ये १७ रुग्ण आढळले आहेत. राज्यात गेल्या १३५ दिवसांत १००४ रुग्ण आढळले आहेत, ज्यात कॉलराचे २२, गॅस्ट्रोचे ३२, अतिसाराचे ४१४, सांध्याचे ५१३ आणि टायफॉइडचे २२ रुग्ण समाविष्ट आहेत. राज्यात आतापर्यंत बर्ड फ्लूचे ७३ रुग्ण आढळले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत मुंबईमध्ये साथीच्या आजारांची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी जून महिन्यात आढळलेल्या रुग्णसंख्येच्या तुलनेत यंदा जूनच्या पंधरा दिवसांतील रुग्ण अधिक असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच राज्याला डेंग्यूच्या आजाराने विळखा घातला आहे. शहरासह ग्रामीण भागात डेंग्यूचे रुग्ण आढळत असल्याने राज्याच्या आरोग्य विभागाची झोपच उडाली आहे.

डेंग्यूचा डंख वाढल्याने पालिका प्रशासनही सतर्क झाले आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीची ही रुग्णसंख्या चिंताजनक असल्याचे राजाची आरोग्य यंत्रणा कामाला लागली आहे. डेंग्यू हा सर्वात मोठ्या प्रमाणावर डासांमुळे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे. हवामान बदल, जलद शहरीकरण आणि लोकसंख्यावाढीमुळे तो वेगाने पसरत आहे. प्रादुर्भाव हा सहसा हंगामी असतो. पावसाळ्यात आणि नंतरच्या काळात रुग्णसंख्या वाढत असते. जागतिक आरोग्य संघटनेने डेंग्यूला सार्वजनिक आरोग्यासाठी असलेल्या टॉप टेन धोक्यांपैकी एक म्हणून वर्गीकृत केले आहे. महापालिका क्षेत्रात मुंबईमध्ये डेंग्यूचे रुग्ण सर्वाधिक आहेत.

# आता रेल्वे इंजिनांची निर्यात

गुजरात आणि बिहार या दोन राज्यांच्या प्रगतीमध्ये प्रचंड तफावत असली, तरी दोन राज्यांनी आता एकाच क्षेत्रात मोठी आघाडी घेतली आहे. हे क्षेत्र म्हणजे रेल्वे इंजिनांची निर्यात. भारताने पश्चिम आफ्रिकेला शंभरहून अधिक 'हाय-टेक लोकोमोटिव्ह' निर्यात करण्यास सुरुवात केली आहे. बिहारमध्ये 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत बांधलेले हे लोकोमोटिव्ह इंजिन चालकांच्या सोयीसाठी जागतिक दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज आहेत. बिहारमधील पाटण्याजवळील मारहोरा रेल कारखान्यात अमेरिकेच्या वेबटेकिन आणि भारतीय रेल्वेच्या संयुक्त उपक्रमातून रेल्वे इंजिने तयार केली जात आहेत. दहा वर्षांमध्ये एक हजार शक्तिशाली मालवाहतूक लोकोमोटिव्ह तयार करण्याच्या सामंजस्य करारांतर्गत २०१५ मध्ये मारहोरा रेल कारखाना स्थापन करण्यात आला. 'वॅबटेक'ने २०१८ मध्ये पहिले इंजिन दिले. त्यानंतर या कारखान्यातून ७०० हून अधिक इंजिने बनवण्यात आली आहेत. बिहारमधील मारहोरा डिझेल लोकोमोटिव्हमधून आता भारत १५० इव्होल्यूशन सिरीज ४३ लोकोमोटिव्ह निर्यात करणार आहे. १५० लोकोमोटिव्हची ऑर्डर तीन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. ती जागतिक स्पर्धात्मक बोलीद्वारे घेण्यात आली. आफ्रिकेतील गिनी या देशाला रेल्वे इंजिनाची पहिली खेप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पाठवण्यात आली. तीन वर्षांमध्ये दीडशे इंजिने पाठवायची आहेत. या आर्थिक वर्षात त्यापैकी ३७, पुढील वर्षी ८२ आणि तिसऱ्या वर्षी ३१ इंजिने पाठवली जातील.

या मोहिमेतील साडेचार हजार अश्वशक्तीच्या लोकोमोटिव्हमध्ये एसी प्रोपल्शन, रीजनरेटिव्ह ब्रेकिंग, मायक्रोप्रोसेसर-आधारित नियंत्रणे आणि देखभाल आणि अपग्रेडच्या सोयीसाठी मॉड्यूलर आर्किटेक्चर आहे. प्रत्येक लोकोमोटिव्ह उच्च दर्जाच्या उत्सर्जन मानकांची पूर्तता करते आणि त्यात एसी कॅब आहे. ही इंजिने अग्निशमन प्रणाली आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. केबिन आधुनिक आणि अर्गोनॉमिक आहेत. त्यात रेफ्रिजरेटर, मायक्रोवेव्ह आणि पाणी न लागणाऱ्या शौचालय प्रणालीसारख्या अतिरिक्त सुविधा आहेत. प्रत्येक लोकोमोटिव्हमध्ये एकच कॅब असते. दोन युनिट्स एकत्रितपणे जास्तीत जास्त परवानगी असलेल्या वेगाने १०० वॅगन ओढू शकतात. सुरळीत आणि चांगली मालवाहतूक हाताळणी सुनिश्चित करण्यासाठी ते डीपीडब्ल्यूसीएस (वितरित पॉवर वायरलेस कंट्रोल सिस्टम)ने सुसज्ज आहेत. मारहौरा प्लांटमध्ये ब्रॉडगेज, स्टँडर्ड गेज आणि केप गेज असे तीन प्रकारचे ट्रॅक आहेत. विविध आंतरराष्ट्रीय वैशिष्ट्यांसाठी लोकोमोटिव्हचे




**कधी काळी तंत्रज्ञान आणि मोठमोठ्या सुविधांसाठी परदेशावर अवलंबून असलेला भारत आता तंत्रज्ञानाचा आणि पायाभूत सुविधांचा वापर करून जगाला मोठ्या प्रमाणात निर्यात करायला लागला आहे. केवळ मागास देशांनाच नव्हे, तर प्रगत देशांनाही भारताच्या रेल्वे इंजिनांची निर्यात व्हायला लागली आहे. जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान, टिकाऊपणा आणि किंमत या सर्वांबाबत भारत आता जगाशी स्पर्धा करत आहे.**

**प्रा. सुखदेव बखळे**

उत्पादन आणि चाचणीसाठी परिसरात हे ट्रॅक ठेवण्यात आले आहेत. लोकोमोटिव्ह कस्टमायझेशन करण्यापूर्वी गिनीच्या भूभागाचा, हवामानाचा आणि आवश्यकतांचा सखोल अभ्यास करण्यात आला. डिझाइन स्थानिक गरजा पूर्ण करते, याची खात्री करण्यासाठी अभियंत्यांनी या पश्चिम आफ्रिकन राष्ट्राला अनेक भेटी दिल्या. त्यात मानक गेज ट्रॅक आणि बदलणाऱ्या हवामान परिस्थितीसाठी योग्य त्या यंत्रणा आहेत. या प्रदेशाचे हवामान लक्षात घेता, आव्हानात्मक वातावरणाचा सामना करण्यास मदत करण्यासाठी लोकोमोटिव्ह कस्टमायझेशन करण्यात आले. बिहारमधील या कारखान्याने २८५ लोकांना थेट रोजगार दिला आहे, तर अप्रत्यक्षपणे १,२१५ रोजगार उपलब्ध झाला आहे. पश्चिम आफ्रिकन राष्ट्राने त्याच्या सर्वात मोठ्या लोहखनिज खाण प्रकल्पावर काम सुरू केल्यामुळे निर्यात करार झाला आहे. त्यामुळे मजबूत मालवाहतुकीची मागणी निर्माण झाली आहे. गिनी प्रजासत्ताकाने रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी रेफ्रिजरेटर आणि मायक्रोवेव्ह ओव्हनसह वातानुकूलित केबिनसह विशिष्ट सुविधांची विनंती केली होती. गिनीमध्ये हवामान परिस्थिती विचित्र असल्याने लोको पायलटसाठी रेफ्रिजरेटर आणि मायक्रोवेव्ह निवडल्याचे कंपनीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. हे लोकोमोटिव्ह पश्चिम आफ्रिकन देशाच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी कस्टमाइज केले आहेत. या निर्यातीमुळे गिनीच्या सर्वात मोठ्या लोहखनिज प्रकल्पासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यास मदत होईल आणि भारत-आफ्रिका आर्थिक संबंध मजबूत होतील. भारतात रेल्वे लोकोमोटिव्हचे उत्पादन १,६८१ युनिट्सपर्यंत वाढले आहे. ते अमेरिका, युरोप, दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांच्या एकूण लोकोमोटिव्ह उत्पादनापेक्षा जास्त आहे. निर्यातीमुळे रेल्वेच्या एकूण महसुलात मोठी वाढ होईल. भारतीय रेल्वेकडे एकूण चार लोको उत्पादन युनिट्स आहेत. त्यात वाराणसी येथील डिझेल लोकोमोटिव्ह वर्क्स, चित्तरंजन येथील चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स, पटियाला येथील डिझेल मॉडर्नायझेशन वर्क्स आणि डंकुनी येथील इलेक्ट्रिक लोको असेंब्ली आणि ॲन्सिलरी युनिट यांचा समावेश होतो. डीएलडब्ल्यू आणि डीएमडब्ल्यू हे डिझेल लोको उत्पादन युनिट्स होते. तथापि त्यांनी अनुक्रमे २०१६-१७ आणि २०१८-१९ पासून इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हचे उत्पादन सुरू केले. भारतात बिहारप्रमाणेच गुजरातमध्ये रेल्वे इंजिन तयार करणारा कारखाना आहे; परंतु तिथे डिझेल इंजिने बनत नाहीत, तर विजेवर चालणारी इंजिने तयार केली जातात. भारत गुजरातमधील नव्याने बांधलेल्या दाहोद इंजिन कारखान्यात उत्पादित केलेल्या सर्वात शक्तिशाली इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह इंजिनपैकी एक युरोपियन देशांना आणि आफ्रिकन राष्ट्रांना निर्यात करण्यास सज्ज आहे.

पंतप्रधानांनी दाहोद येथील प्रकल्प राष्ट्राला समर्पित केल्यानंतर लगेच या कारखान्यातून रेल्वे इंजिनांची निर्यात सुरू झाली आहे. स्वदेशी इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह आता जगातील अनेक देशांमध्ये धावणार आहे. दाहोद प्लांट देशांतर्गत वापरासाठी आणि निर्यातीसाठी नऊ हजार अश्वशक्ती क्षमतेचे इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह तयार करणार आहे. हे लोकोमोटिव्ह भारतीय रेल्वेची मालवाहतूक क्षमता लक्षणीयरीत्या वाढवतील. त्यामध्ये नव्या श्रेणीतल्या ब्रेकिंग सिस्टीम असतील. त्या ऊर्जा वापर कमी करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत. पंतप्रधान मोदी यांनी एप्रिल २०२२ मध्ये दाहोद प्लांटची पायाभरणी केली होती. तीन वर्षांपेक्षा कमी कालावधीमध्ये रेल्वेने दाहोदमधील रोलिंग स्टॉक वर्कशॉपमध्ये लोको मॅन्युफॅक्चरिंग शॉप यशस्वीरीत्या बांधले असून उत्पादन सुरू केले आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'मेक फॉर द वर्ल्ड' उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी येथे ब्रॉड-गेज आणि स्टँडर्ड-गेज इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह तयार केले जात आहेत. हरित ऊर्जेचा वापर करून लोकोमोटिव्हची निर्मिती केली जात आहे. ते सरकारच्या शाश्वततेसाठीच्या वचनबद्धतेला बळकटी देते. 'मेड-इन-इंडिया' लोकोमोटिव्ह ४,५०० ते ५,००० टनांपर्यंतचे भार वाहून नेण्यास सक्षम आहे. अगदी तीव्र चढ-उतारांवरही हा भार वाहून नेण्याची त्याची क्षमता आहे. अत्याधुनिक 'आयजीबीटी प्रोपल्शन' तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेले हे लोकोमोटिव्ह वाढीव ऊर्जा कार्यक्षमता आणि उच्च कार्यक्षमता देतात. ते रेल्वेच्या आधुनिकीकरण आणि स्वावलंबनतेला हातभार लावत आहेत.

**(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)**

# इन्फ्लुएन्सर्स – द डिजिटल ब्रँड ॲम्बॅसेडर

आजच्या डिजिटल युगात इन्फ्लुएन्सर्स हे खूप महत्त्वाचे ठरतात. ग्राहकांच्या मतांवर आणि खरेदीच्या निर्णयांवर ते मोठा प्रभाव टाकत आहेत. लाखो फॉलोअर्स त्यांच्या प्रत्येक शब्दाकडे लक्ष देत असतात, त्यामुळे ते आपल्या विचारांवर आणि वर्तनावर मोठ्या प्रमाणात परिणाम करतात. जाहिरातीमधील दाव्यांचा खरेपणा पडताळून बघण्याचे काम, Advertising Standards Council of India-आस्की–सातत्याने करीत असते. नुकताच त्यांचा २०२४-२५ वर्षाचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. कित्येक जाहिरातींमध्ये केलेले दावे पुराव्यानिशी सिद्ध करण्यास सांगितले असता, उत्पादक त्या दाव्यांची पुष्टी करू शकले नाहीत. आस्कीने केलेल्या तपासणीत ९४% जाहिरातींमध्ये बदल होणे आवश्यक होते. सोशल मीडियाच्या इंस्टाग्राम, एक्स, व्हॉट्सॲप आणि इतर अनेक प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणावर जाहिराती केल्या जातात.

ऑनलाइन खरेदी किंवा उत्पादकाचे संकेत स्थळ अशा ठिकाणी सुद्धा कित्येक वेळा खोट्या/विकत घेतलेल्या प्रतिक्रिया, बनावट प्रतिमा आणि अफाट/अवाजवी फायद्याचे फसवे दावे केले जातात. डिजिटल माध्यमे जास्त प्रचलित होत असताना आणि अनेक उपभोक्ते विविध प्लॅटफॉर्मवर जाहिरात पाहत असताना, जाहिरात आणि मुख्य विषय यामधील सीमारेषा अस्पष्ट होत चालल्या आहेत. त्यांच्या क्षेत्रात तज्ज्ञ म्हणून ओळख निर्माण करतात आणि त्यांच्या प्रेक्षकांशी विश्वासाचं नातं तयार करतात. जेव्हा ते एखाद्या उत्पादनाची किंवा सेवेची शिफारस करतात, तेव्हा त्यांचे फॉलोअर्स त्या गोष्टीवर अधिक विश्वास ठेवतात. वैयक्तिक अनुभव शेअर करतात, ज्यामुळे त्यातील कंटेंट अधिक खरीखुरे वाटते. त्यांचे प्रेक्षकांशी भावनिक नातं तयार करतात. त्यामुळे जेव्हा ते एखादं उप्तादन प्रमोट करतात, तेव्हा त्यांचे फॉलोअर्स ते लक्षात ठेवतात आणि त्या ब्रँडबद्दल सकारात्मक भावना निर्माण होते.

विविध पद्धतींनी ब्रँडचे प्रमोशन करतात, उत्पादनांचे परीक्षण (रिव्ह्यू), अनबॉक्सिंग व्हिडीओ, ट्युटोरियल्स किंवा डेमो अशा पद्धती वापरतात. त्यांच्या फॉलोअर्सशी एक विश्वासाचं नातं निर्माण करतात. त्यामुळे त्यांची शिफारस ही सामान्य जाहिरातींपेक्षा जास्त प्रभावी वाटते. अनेकवेळा ब्रँडसोबत भागीदारी करून नव्या उत्पादनांची ओळख करून देतात. गिवअवे Giveaway) स्पर्धा घेतात. इन्फ्लुएन्सर्सना त्यांची लोकप्रियता, प्रभाव आणि सहभाग यानुसार उत्पादनाच्या/सेवेच्या प्रमोशनसाठी पैसे दिले जातात. हे पूर्णतः व्यावसायिक करारांवर अवलंबून असते. प्रत्येक पोस्ट, व्हिडीओ किंवा प्रचार मोहिमेसाठी ठरावीक पैसे मिळतात. काही वेळा उत्पादक ब्रँड इन्फ्लुएन्सरला उत्पादन मोफत देतो आणि त्याच्या बदल्यात प्रचार करावा लागतो. इन्फ्लुएन्सरच्या लिंकवरून खरेदी झाली, तर त्यांना त्यावरून टक्केवारीत कमिशन मिळते. काही मोठ्या इन्फ्लुएन्सर्सना दीर्घकालीन करार किंवा मासिक मानधन मिळते. डिजिटल जाहिरातीत इन्फ्लुएंन्सर्ससाठी असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे तपशील आस्कीने (ASCI) प्रसिद्ध केले आहेत. ब्रँडशी असलेली आर्थिक-व्यावसायिक जोडणी स्पष्ट करणे. Disclosure) म्हणजेच ब्रँडकडून मिळणारे फायदे ग्राहकांना समजेल अशा भाषेतून लेखी-तोंडी जाहीर करणे. उदा. Ad, sponsored, partnership इत्यादी. यू-ट्यूबसाठी तर includes paid promotion असे वेगळे स्पष्ट करायला हवे. इन्फ्लुएन्सर्सनी उत्पादनाबद्दल अतिशयोक्ती करू नये. दावे पुराव्यानिशी करावेत. प्रतिबंधित वस्तूंची जाहिरात करू नये. इन्फ्लुएंन्सर्सनी स्वतः हे उत्पादन वापरलेले असावे, त्याची पूर्ण माहिती आणि अनुभवही असावा. इन्फ्लुएन्सर जरी कृत्रिम-बुद्धिमत्तेद्वारे निर्मित (AI) असला तरी वरील सर्व नियम लागू होतात. वरील नियमांचे उल्लंघन केल्यास पहिल्या चुकीसाठी १० लाख तर वारंवार केलेल्या चुकीसाठी ५० लाखांपर्यंत दंड आहे.



**स्वप्ना कुलकर्णी**
मुंबई ग्राहक पंचायत

जशी इन्फ्लुएंन्सर्ससाठी नियमावली आहे तशीच ग्राहकांसाठी ही काही अधिकार आणि जबाबदाऱ्या आहेत. ग्राहकांनी हे पक्के जाणून असावे की इन्फ्लुएन्सर्सना जाहिरातीसाठी पैसे दिलेले असतात, त्यामुळे त्यांच्या प्रतिक्रिया पूर्णतः प्रामाणिक असतीलच असे नाही. उत्पादन खरेदी करण्याआधी इतर ग्राहकांचे अनुभव वाचा, ब्रँड तपासा. ग्राहक म्हणून ब्रँड विषयी सर्व माहिती मिळविण्याचा अधिकार आहे, तो वापरा, तिथे 'जाऊ दे' वृत्ती नको. भ्रामक, खोट्या, आरोग्यविषयी अप्रमाणिक दावे आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींची तक्रार करता येते, तशी करा. जाहिरातदारांनी दिलेल्या लिंक्सवर आर्थिक किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये. लिंक अधिकृत असल्याची खात्री करावी. ग्राहकांनी उत्पादन खरेदी करताना काही गोष्टींची दक्षता घ्यावी. ASCI इन्फ्लुएन्सर्सवर नियंत्रण कसे ठेवते? डिस्क्लोजर लेबल्स (प्रकटन टॅग) - इन्फ्लुएन्सर्सनी जाहिरातीसाठी पैसे घेतल्यास पोस्टमध्ये स्पष्ट टॅग लावणे आवश्यक आहे.

जे स्पष्ट आणि सहज लक्षात येणारे असावे. तसेच ते पोस्ट किंवा कॅप्शनच्या पहिल्या दोन ओळीत प्रकटन झालेले असावे. व्हिडीओत किमान ३ सेकंद हे टॅग स्क्रीनवर दिसायला हवेत. ऑडियोत हे स्पष्टपणे उच्चारले गेले पाहिजेत. ASCI नियमांचे उल्लंघन ओळखते. AI-आधारित तंत्रज्ञान वापरून, सोशल मीडिया स्कॅन करून तसेच ग्राहकांच्या तक्रारींवरून कळते. ASCI इन्फ्लुएन्सर/ब्रँडला नोटीस पाठवतात. चुकीची जाहिरात ASCI च्या संकेतस्थळावर उघडपणे प्रदर्शित केली जाते. वारंवार उल्लंघन झाल्यास सरकारी यंत्रणेकडे तक्रार केली जाऊ शकते. ग्राहक १८००-११-४००० या कंज्युमर हेल्पलाईनवर किंवा consumerhelpline.gov.in या ईमेलवर किंवा https://tara.ascionline.in/auth/login ही लिंक वापरून तक्रार करू शकतात.

mgpshikshan@gmail.com



**इन्फ्लुएन्सर्स म्हणून काम करणाऱ्या काही व्यक्ती असतात. सेलिब्रिटी आणि इन्फ्लुएन्सर्स यामध्ये फरक असतो. तथापि काही इन्फ्लुएन्सर्स हळूहळू सेलिब्रिटी या पदवीपर्यंत पोहोचतात. काय करतात ही मंडळी? त्यांच्या उपजीविकेसाठी रील बनवतात. त्यातून त्यांना रगड कमाई होत असते. बहुतेकदा या रील्सच्या माध्यमातून विविध उत्पादने, विचारधारा किंवा सेवा यांची वारेमाप भलामण असते. खरं तर यांच्याकडे जाहिरात म्हणूनच पाहिले जाते, थेट किवा छुपी.**

## राशिभविष्य

**॥ पंचांग ॥**

आज मिती आषाढ शुद्ध नवमी शके १९४७, चंद्र नक्षत्र चित्रा योग शिव, चंद्र राशी तूळ भारतीय सौर १३ आषाढ शके १९४७ शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५, मुंबईचा सूर्योदय ६.०५, मुंबईचा सूर्यास्त ७.२०, मुंबईचा चंद्रोदय १.५२, मुंबईचा चंद्रास्त १.२७ उद्याची राहू काळ ११.०३ ते १२.४२ शुभ दिवस.

**॥ भविष्य ॥**

**मेष** : तरुण-तरुणींना मुलाखतीच्या संधी येणार आहेत.

**वृषभ** : कामातील सातत्य टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

**मिथुन** : व्यावसायिक कार्यक्षेत्राच्या दृष्टिकोनातून चांगला दिवस आहे.

**कर्क** : शासकीय कामांना गती येणार आहे.

**सिंह** : प्रवासात आपणास अपेक्षित लाभ प्राप्त होणार आहेत.

**कन्या** : महत्त्वाचे निर्णय घेताना फार जपून घेणे महत्त्वाचे आहे.

**तूळ** : व्यवसायिक छोटे प्रवास होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : कामे गतिमान होऊन पूर्ण होतील. थोडासा मनावर ताण राहणार आहे.

**धनू** : नोकरीमध्ये इच्छित काम मिळेल.

**मकर** : कोणत्याही मोहाला बळी पडू नका.

**कुंभ** : परदेशातील महत्त्वाची कामे होतील.

**मीन** : बोलताना मनावर ताबा ठेवणे आवश्यक आहे.

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयास माजी विद्यार्थ्यांकडून 1 लाख रुपये किमतीचे 30 बेंच भेट!

## दहावी 2005 च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून आदर्श उपक्रम!

जामखेड / प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील एसएससी बॅच मार्च २००५ मधील विद्यार्थी - विद्यार्थिनींचा स्नेहसंमेलन कार्यक्रम शुक्रवार ११ जुलै रोजी पार पडला. एसएससी बॅच मार्च २००५ मधील ८० विद्यार्थी विद्यार्थिनी यावेळी सहभागी होते.

स्नेह संमेलन कार्यक्रमाच्या माध्यमातुन सर्व मित्र - मैत्रिणी 20 वर्षानंतर एकत्र आले होते.जून्या - नव्या आठवणींना उजाळा देत एकमेकांच्या सूख - दुःखात पुढील काळात मदत करणे व सहभागी होण्याचे सर्वांनी ठरवले.तसेच ज्या शाळेने आपणाला घडवले व जून्या आठवणी दिल्या त्या शाळेला वस्तू रुपी भरीव मदत स्वरुपात १ लाख रुपये किमतीचे ३० बेंच भेट देण्यात आले.२२ बॅचच्या वतीने भावी पिढीला शैक्षणिक संधी मिळतील हा या ग्रुपचा व स्नेह संमेलन कार्यक्रमाचा उद्देश होता.शाळेत सकाळी ११ वाजता सर्वजण जमले. बरोबर ११ वाजता शाळेची घंटा वाजल्यावर परिपाठ घेण्यात आला. माजी मुख्याध्यापक श्री. सदाफुले सर यांनी परिपाठ घेतला. स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष श्री शहाजी पाटील, सदस्य दत्तात्रेय हजारे आण्णा, गौतम मते तसेच विद्यालयाचे सध्याचे प्राचार्य श्री जोरे सर उपस्थित होते.या स्नेह संमेलन कार्यक्रमासाठी नाष्टा, जेवण याची पूर्ण सोय युवा उद्योजक मा. विकी शेठ मंडलेचा यांनी केली. तसेच सत्कार व शुभेच्छा खर्चाचा पूर्ण भार युवा उद्योजक मा. अनिल शेठ मते उचलला. २२ २००५ बॅच मधील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी सर्वांनी मिळून १ लाख रुपये किमतीचे ३० बेंच शाळेला भेट दिले. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे या बॅच मधील विद्यार्थी मा. दादा नामदेव लोंढे यांनी स्टेज बांधून देण्याचे घोषित केले.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.कार्यक्रम सुरू झाल्यावर विद्यार्थी परिचय, उद्योग, शिक्षण यावर चर्चा झाली. सूत्रसंचालन शिक्षक मा. संतोष सरसमकर सर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार सौ. रसिका वाळके यांनी मानले.



**भावी पिढीचे शैक्षणिक भविष्य घडणार**

माजी विद्यार्थ्यांच्या एकत्र प्रयत्नातून शाळेला भौतिक सुविधा पूर्ण होतील. यातूनच भावी पिढीचे शैक्षणिक भविष्य घडणार आहे. एसएससी २००५ च्या बॅचच्या माध्यमातून आम्ही स्टेज व बेंचचा प्रश्न सोडवला आहे. पुढील काळात ही विद्यालयास सहकार्य करण्यासाठी प्रयत्न करू...

– अशोक पटाडे, (माजी विद्यार्थी एस.एस.सी. बॅच २००५)

# महादेव मुंडेंसोबत भांडण करणारी 'ती' व्यक्ती कोण ?

## मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर कायम

बीड / प्रतिनिधी

२० महिने उलटूनही महादेव मुंडे खून प्रकरणातील आरोपी निष्पन्न झालेले नाहीत. याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सभागृहात दिली. तपास करताना एका महिलेने दोन व्यक्ती भांडत होत्या, अशी माहिती दिली असून, त्यानुषंगाने तपास सुरू असल्याचे फडणवीस यांनी सांगितले; पण महादेव मुंडे यांच्याशी वाद घालणारी दुसरा व्यक्ती कोण? याबाबत चर्चेला उधाण आले असून, पोलिसांसमोर ती व्यक्ती शोधण्याचे आव्हान कायम आहे.२१ ऑक्टोबर २०२३ रोजी महादेव मुंडे यांचा खून झाला होता; परंतु अद्यापही आरोपी निष्पन्न नाहीत.




### महादेव मुंडे हत्या प्रकरणात पोलिसांनी काय केलं?

आतापर्यंत तपासात १९६ जणांची चौकशी करण्यात आली. ८३ साक्षीदारांची तपासणी पोलिसांकडून करण्यात आली. त्याचबरोबर २८६ लोकांची मोबाइल क्रमांकांसंदर्भात चौकशी केली गेली आहे. १५० मोबाइल क्रमांकांचा डेटा पोलिसांनी मिळवला असून, ३७ जणांचे जबाब नोंदवले आहेत.

महादेव यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे मारेकरी शोधण्याच्या मागणीसाठी आक्रमक झाल्या आहेत. ज्ञानेश्वर मुंडेंनी घेतलं होतं विष. १७ जुलै रोजी त्यांनी पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांची भेट घेऊन आल्यावर विषारी द्रव प्राशन केले होते. त्यांच्यावर गुन्हाही दाखल झाला होता. त्यानंतरही त्यांनी आपण महिनाभर वाट पाहून पुन्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातच आत्मदहन करणार, असा इशारा दिला आहे.

**८ महिने उलटले, पण हत्येचा उलगडा नाही :** २१ ऑक्टोबर २०२३ ते १९ जुलै २०२५ हा १ वर्ष, ८ महिने आणि २९ दिवसांचा कालावधी उलटूनही पोलिसांना मुंडे खून प्रकरणाचा उलगडा करता आलेला नाही. आतापर्यंत सात तपास अधिकारी बदलले. यात आयपीएस कमलेश मीना यांचाही समावेश होता; परंतु त्यांनाही अपयश आले. आता हा तपास स्थानिक गुन्हे शाखा करत आहे.

**बांगरने पोलिसांना काय सांगितले? :** बाळा बांगरने या प्रकरणात वाल्मीक कराड, त्याचा मुलगा व गोट्या गित्ते असल्याचा आरोप केला, त्यांनी मांसाचा तुकडा आपल्यासमोर कराडच्या टेबलवर ठेवल्याचा दावा केला होता. पोलिसांनी बांगर यांचा जबाब घेतला; परंतु पुढे काय चौकशी झाली, हे पोलिसांनी सांगितलेले नाही.

## प्रवीण गायकवाड भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ तहसीलदार यांना सर्वपक्षीयांचे निवेदन



पाटोदा / प्रतिनिधी

अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे दिनांक १३ जुलै २०२५ रोजी शिव, शिव, शाहु, फुले, आंबेडकर अण्णाभाऊ यांच्या विचारांचे पाईक असणारे राज्यस्तरीय नेते मा. प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर काही समाजकंटकांनी शाही फेकून आणि अन्य हिंसक प्रकारांनी जीवघेणा हल्ला केला. या घटनेच्या निषेधार्थ पाटोदा तहसीलदार यांना कॉग्रेस,शेकाप शिवसेना (उबाठा) यांनी निवेदन देऊन सरकारने संबंधित आरोपींना कठोर शासन कराण्याची मागणी केली.शेकापाचे भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे, प्रकाश वीर, निखिल पवने, सुहास मडके, निलेश गांगुर्डे, आकाश कांकरिया , कृष्णा चौरे, बाळासाहेब गायकवाड, तालुकाध्यक्ष (वंचित बहुजन आघाडी) तुकाराम नागरगोजेसह सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वाक्षऱ्या करून आपला तीव्र निषेध नोंदवला.

## संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा निषेध नोंदवत दिले तहसीलदारांना निवेदन !



जामखेड / प्रतिनिधी

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या हल्ल्याचा आज जामखेड येथे मराठा-बहुजन समाजाच्या संघटनांसह विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी जामखेडचे तहसीलदार यांना निवेदन देत जाहीर निषेध केला.

निवेदन देतावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त करताना म्हणाले की संभाजी ब्रिगेड संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट या ठिकाणी शाईफेकीची घटना घडली.सदर ठिकाणी प्रवीण गायकवाड यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वाजत गाजत ते कार्यक्रमस्थळी जात होते. या दरम्यान त्यांच्यावर शिवधर्म प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी शाईफेकीचा हल्ला केला. प्रविण गायकवाड हे संविधान वादी विचाराचे नेते आहेत. ते ज्या संघटनेचे नेतृत्व करतात ती संभाजी ब्रिगेड महापुरुषांच्या सन्मानार्थ आणि मराठा आरक्षण लढ्यात कायम आघाडीवर राहिली आहे.हल्लेखोर हे गुंड प्रवृत्तीचे आहेत. त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे.त्यांना कठोर शासन करावे. तसेच या हल्ल्यामागे असलेल्या राजकीय शक्तींचा पदार्फाश करुन भविष्यात अशा हल्ल्यांना आळा बसण्यासाठी ठोस कारवाई व्हावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.यावेळी उपस्थित मराठा समन्वयक अवधूत पवार, वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव, प्रथम नगराध्यक्ष विकास राळेभात, नगराध्यक्ष निखिल घायतडक, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत राळेभात, प्राचार्य विकी घायतडक, आदिवासी नेते प्रकाश काळे, संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष कुंडल राळेभात, सुनील जगताप,गोरोबा पतसंस्थेचे चेअरमन विनायक राऊत, प्रहार जनशक्तीचे जयसिंग उगले, तालुका अध्यक्ष नय्युमभाई सुभेदार, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष आतिश पारवे, ॲड. हर्षल डोके, ॲड. बाळासाहेब घोडेस्वार, शहराध्यक्ष वसीम सय्यद, नगरसेवक अर्षद शेख, भिमटोला ग्रुपचे बापूसाहेब गायकवाड, पारनेर बँकेचे संचालक दत्तात्रय सोले पाटील, राजन मेघडंबर, अशोक पठाडे, अशोक घुमरे, डॉ. चंद्रशेखर नरसाळे, हरिभाऊ आजबे, सरपंच सागर कोल्हे, गणेश म्हस्के, किरण पवार, प्रशांत वारे, भाऊसाहेब शिंदे, प्रा. शहाजी डोके सर, पोपट लोखंडे, शिवा लोखंडे, काकासाहेब कोल्हे, ज्ञानदेव ढवळे, दत्तात्रय डिसले आदी मान्यवर उपस्थित होते.

# नफरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी गिरवला लोकशाहीचा धडा !

पाटोदा / प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शा.नफरवाडी येथे शालेय मुख्यमंत्री पदाची निवडणूक ईव्हीएम मशीनच्या सहाय्याने घेण्यात आली.या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणे,मतदार यादी प्रसिद्ध करणे,अजार्ची छाननी करणे, सूचक,अनुमोदक,अपूर्ण अर्ज बाद करणे,अर्ज मागे घेणे, प्रचार करणे या सर्व बाबी करण्यात आल्या. मतदान कक्ष,मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी नेमण्यात आले.शेवटी मतदान घेवून निकाल जाहीर करण्यात आला.

या उपक्रमातून लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव सर्व विद्यार्थ्यांनी घेतला.भारतीय लोकशाहीतला प्रौढ मताधिकार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजला, योग्य उमेदवार निवडणे,प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत भाग घेणे इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करणे या जबाबदाऱ्यांची अनुभूती विद्यार्थ्यांना आली. आई-वडील किंवा घरातील इतर प्रौढ व्यक्ती मतदान करतात मग ती प्रक्रिया कशी असेल ? विद्यार्थ्यांचा मनातील या जिज्ञासेचे उत्तर स्वतः विद्यार्थ्यांना कृतीतून मिळाले. प्रत्यक्ष निवडणुकीप्रमाणे शाळेतील शिक्षकांच्या संकल्पनेतून शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक घेण्याचे नियोजन केले या मध्ये ॲप च्या माध्यमातून ईव्हीएम मशीन तयार करण्यात आले त्यावर उमेदवारांचे नाव आणि फोटो ॲड करून बॅलेट आणि कंट्रोल युनिट तयार करण्यात आले.इच्छुक उमेदवारांना प्रचारासाठी दोन दिवस वेळ देण्यात आला.



शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अभिरुप मतदानाचे प्रात्यक्षिक दाखवून मतदान प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.या निवडणुकीसाठी 9 उमेदवार आणि शेवटी ठडळअ अशी रचना १५ वर करण्यात आली होती.सदरील ईव्हीएम वर आजची मतदान प्रक्रिया पार पडली.शाळेतील सर्व विद्यार्थी,शिक्षक यांनी सहभाग घेतला.एकूण मतदान 118 झाले. शेवटी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सर्व उमेदवार व मतदान प्रतिनिधी यांच्यासमोर मतमोजणी करून निकाल जाहीर केला, शाळेतील विद्यार्थिनी चैताली बाळू ढोले हिला 60 मतदान झाले तिला 48 मतांनी विजेता घोषित करण्यात आले.तद्नंतर शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी नवनिर्वाचित मुख्यमंत्री चैताली हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.चैताली ढोले हिने आपले मनोगत व्यक्त करून सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले.या निवडीनंतर सर्व विद्यार्थ्यांनी तु चाल पुढं तुला रं गड्या भिती कशाची या गीतावर ठेका धरत नृत्य करत आनंद साजरा केला.उमेदवार म्हणून चैताली ढोले,सोहम मंडलिक,जयराम वाघ,विठ्ठल दराडे,दिपाली ढोले,दर्शन मंडलिक,काजल दराडे,राधिका मंडलिक, भूमिका मंडलिक हे होते.प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेमध्ये केंद्राध्यक्ष सोहम वायकर आणि श्रेयस ढेरे,मतदान अधिकारी 1 आरती सवासे,मतदान अधिकारी 2 सविता मुळे,मतदान अधिकारी 3 कल्याणी तळेकर तसेच मतदान प्रतिनिधी म्हणून समृद्धी तांबे,सुजाता सस्ते,साक्षी तांबे,महेश दराडे यांनी कामकाज केले.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे सर तसेच शाळेतील शिक्षक सचिन राऊत सर, रमेश मुरूमकर सर,शकुंतला काकडे मॅडम,सारिका वावरे मॅडम यांनी काम पाहिले.

### विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची अनुभवासी सांगड

प्रत्यक्ष मतदान करून बुथच्या बाहेर आल्यावर प्रौढ मतदारांनाही होणार नाही एवढा आनंद या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. शाळेत शिकवलेला प्रौढ मताधिकार बजावताना विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची अनुभवासी सांगड घालण्याचे काम या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले.

– **मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे, जि.प.प्रा. शा.नफरवाडी ता.पाटोदा जि.बीड.**

# साध्या लग्न पद्धतीचा आदर्श : तरुण पिढीने घडवावे परिवर्तन



मा. कोमलताई बनकर, बीड यांनी व्यक्त केलेल्या विचारांमधून आजच्या तरुण-तरुणींसाठी एक महत्त्वाचा संदेश समोर येतोः साध्या आणि सोप्या लग्न पद्धतीचा अवलंब करून समाजापुढे नवा आदर्श उभा करा. आजच्या काळात लग्न समारंभ म्हणजे केवळ आनंदाचा सोहळा न राहता, एक आर्थिक ओझे बनत चालले आहे. मोठमोठ्या लग्नांच्या स्पर्धेत अनेक कुटुंबे कर्जबाजारी होत आहेत, तर काहींना आपली जमीन-जुमला विकावा लागत आहे. अशा परिस्थितीत तरुण पिढीने आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून, अवाढव्य खर्च टाळून साध्या पद्धतीने लग्न करण्याचा आदर्श घालून द्यावा.

**स्पर्धेच्या मागे न लागता, भविष्याचा विचार करा**

लग्नावर होणारा प्रचंड खर्च हा केवळ एका दिवसाचा सोहळा साजरा करण्यासाठी नसून, तो मुला-मुलींच्या भविष्याला बांधून टाकणारा ठरतो. हा पैसा जर शिक्षण, व्यवसाय, किंवा इतर गरजांसाठी वापरला तर नव्या जोडप्याचं आयुष्य अधिक सुखकर होऊ शकतं. श्रीमंतांचे अंधानुकरण करून गरीब कुटुंबांनी स्वतःला कर्जाच्या खाईत लोटण्यापेक्षा, साध्या पद्धतीने लग्न करून समाजाला नवा संदेश द्यावा.



### महाराष्ट्राच्या संत परंपरेचा आदर्श

महाराष्ट्राला संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, आणि समाजसुधारक जैसे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वांची प्रेरणादायी परंपरा लाभली आहे. या महामानवांनी साधेपणा, समता आणि समाजहित यांना नेहमीच प्राधान्य दिले. आजच्या तरुणांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन, लग्नासारख्या पवित्र सोहळ्याला साध्या पण अर्थपूर्ण स्वरूपात साजरे करावे. अशा पद्धतीने केलेले लग्न केवळ कुटुंबालाच नव्हे, तर संपूर्ण समाजाला प्रेरणा देऊ शकते.

### साधेपणा हाच खरा श्रीमंतीचा मार्ग

साध्या लग्न पद्धतीचा अवलंब करणे म्हणजे केवळ पैशाची बचत नव्हे, तर एका नव्या, समृद्ध आणि जबाबदार समाजाची उभारणी आहे. श्रीमंतांचे अंधानुकरण करण्यापेक्षा, आपल्या परिस्थितीला साजेसे आणि मूल्यांवर आधारित आयुष्य जगण्याचा मार्ग तरुणांनी निवडावा. मा. कोमलताई बनकर यांचा हा संदेश प्रत्येक तरुण-तरुणीने आत्मसात करून, समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी पुढाकार घ्यावा. साधेपणातच खरी श्रीमंती आहे, आणि हा आदर्श घालून देण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे...

### तरुण पिढीसमोर आव्हान आणि संधी

- आजच्या तरुण-तरुणींमध्ये समाजाला नवं दिशादर्शन देण्याची ताकद आहे. साध्या लग्न पद्धतीचा अवलंब करून ते नवा आदर्श निर्माण करू शकतात. यासाठी काही सोप्या पण प्रभावी पावलं उचलता येतील:
- लग्न समारंभ साधा ठेवा : मर्यादित पाहुणे, साधी सजावट आणि स्थानिक संसाधनांचा वापर करा.
- आर्थिक नियोजन : लग्नासाठीचा खर्च काटेकोरपणे नियोजित करा आणि भविष्यासाठी बचत करा.
- सामाजिक संदेश : साध्या लग्नाच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक संदेश द्या. *परंपरांचा आदर* : साधेपणातही आपल्या सांस्कृतिक आणि पारंपरिक मूल्यांचा आदर राखा.

साधेपणा हा केवळ आर्थिक बचतीचाच प्रश्न नाही, तर तो मूल्यांचा आणि संस्कृतीचा देखील प्रश्न आहे.

पान १ वरुन

## अकरावी प्रवेश प्रक्रिया लांबल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम !

करणे ही त्यांना कठीण झाले आहे. शिक्षण संस्थांनीही या प्रकरणी हातबलता व्यक्त केली आहे. या लांबलेल्या प्रवेश प्रक्रियेचा विद्यार्थी आणि पालक या दोघांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक आयुष्यावर नकारात्मक परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने या प्रक्रिये तातडीने लक्ष घालून प्रवेश प्रक्रियेतील अडथळे दूर करावेत अशी मागणी केली जात आहे. दरम्यान अकरावी प्रवेशाची दुसरी फेरी सुरू असून याची यादी प्रसिद्ध झाली आहे तसेच कनिष्ठ विद्यालयातील प्रवेश प्रक्रिया 50 टक्के पूर्ण झाली आहे.

**ऑनलाइन प्रणालीत अडचणी**

काही विद्यार्थी एकावेळी इतर अभ्यासक्रम किंवा स्पर्धा परीक्षेच्या तयारीतही असतात अकरावी प्रवेश प्रक्रियेतील विलंबामुळे त्या नियोजनावर परिणाम झाला आहे तसेच प्रवेश याबाबत वारंवार बदलणारे नियम फेर तपासणी यादी आणि ऑनलाइन प्रणालीतील अडचणी यामुळे पालक आणि विद्यार्थी अधिक गोंधळलेला आहे.

# निवडणुकीपेक्षा मतदाराच्या कुटुंबाचे भविष्य महत्त्वाचे ! : गणेश कवडे

## निवडणुकीच्या प्रचारातून गणेश कवडे यांनी केली होती विचारांची पेरणी

पाटोदा / प्रतिनिधी

गेल्या तीन वर्षांपूर्वी निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती. पाटोदा नगरपंचायतीच्या निवडणुकीत जनसेवक गणेश कवडे हे निवडणुकीच्या रिंगणात होते. वार्ड क्रमांक 17 मधून आपले विचार घेऊन जनतेला सामोरे गेले. त्यांनी विचारांची पेरणी केली होती परंतु निवडणुकीत आलेल्या अपयश ने खचून न जाता त्यांनी केलेली विचाराची पेरणी कुठेतरी कामाला येईल हे त्यांना माहीत होतं. प्रत्येक घरात एक दोन तास विचार पेरत होते त्या विचारातून निवडणुकीत जरी अपयश आलं तरी भविष्यात त्या कुटुंबाला बळ मिळणारे विचार दिले होते. तेच विचार आज आसिफ भाई शेख यांच्या घरात खरे होताना दिसले. त्यांच्या मुलांना विचारले होते कितवीत आहात शिक्षणाविषयी चर्चा करून शिक्षणाचे महत्त्व समजून सांगितले होते दहावीला चांगले मार्क आले तर पॉलिटेक्निकला नंबर लागेल असेही सांगितलं होतं.. हुजेब शेख त्या मुलानेही ते लक्षात ठेवलं अभ्यास केला दहावीला उत्तीर्ण झाली आज संभाजीनगरला गव्हर्मेंट कॉलेजला मेकॅनिकल इंजीनियरिंग ला नंबर लागला त्यांच्या घरच्यांनी मला कळवलं मी तात्काळ त्यांच्या घरी जाऊन हुसेब शेख याचा सत्कार केला याच समाधान असल्याचं जनसेवक गणेश कवडे यांनी सांगितले..

निवडणुका येतात निवडणुका जातात परंतु निवडणुकीतून काय घ्यायचं आणि काय द्यायचं हे आपणच ठरवायचं असतं. जनसेवक गणेश कवडे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यानंतर प्रत्येकाच्या घरात जाऊन पेरलेले विचार निवडणुकीत जरी कामाला आले नाही तरी त्या कुटुंबाच्या कामाला येतील या हेतून त्यांनी ते विचार पेरले होते. भविष्य त्या कुटुंबाचं चांगलं व्हावं चांगलं घडावं या हेतून त्यांनी निवडणुकीतून पेरलेले विचार आज खऱ्या अर्थानं साक्षात उतरले आहेत असं दिसत आहे.कवडे यांनी प्रत्येक घरात जाऊन जे विचार पेरले होते तेच उगताना दिसत आहेत. विचाराची ताकद खूप मोठी आहे की फक्त योग्य वेळ योग्य ठिकाणी पोहोच होऊन गरजेचं असतं तेच गणेश कवडे यांनी निवडणुकीच्या माध्यमातून केलं आणि त्याचे फळ सर्वांसमोर दिसत आहे असं म्हटलं तर वावगं वाटायला नको कारण की विचाराची देवाण-घेवाण ही तितकीच महत्त्वाची असते तितकी योग्य ठिकाणी योग्य वेळी जाणं गरजेचं आहे. जनसेवक गणेश कवडे यांच्यासारखे सर्वच राजकीय नेते विचार करू लागले तर राजकारणापेक्षा त्या कुटुंबाला सक्षम करण्यासाठी महत्त्वाचं पाऊल ठरेल हे मात्र नक्की आहे...



### निवडणुकीपेक्षा त्या कुटुंबाच्या चेहऱ्यावरील आनंद महत्त्वाचा : गणेश कवडे

निवडणूक येतात जातात परंतु जे मतदार मतदान रुपी आशीर्वाद देतात त्यांना विसरता कामा नये.. त्यांच्या कुटुंबाचं भविष्य आपल्या हाती असतं पण ते आपण विचारातून त्यांना घडवायचं असतं.. तेच काम निवडणुकीत केलं निवडणुकीपेक्षा प्रत्येक कुटुंबाला महत्त्वाचं समजून विचार दिले त्याच विचारातून अनेक कुटुंब यशस्वी होताना दिसत आहेत याच समाधान आहे. भविष्यात निवडणुकीपेक्षा एखाद्या कुटुंबाचं भविष्य घडवायला आवडेल... – **जनसेवक गणेश कवडे**

साप्ताहिक दिव्य • सोमवार, दि.२१ जुलै २०२५

# वास्तव

संपादक - सचिन पवार

## देशाचं राजकारण फिरवणारे पवार साहेब

देशातील प्रत्येक पक्षाबरोबर चांगले संबंध आणि प्रत्येक पक्षातील नेत्यांबरोबर चांगले संबंध ठेवणारे एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे पवार साहेब.. देशात काही घडलं की पवार साहेब कुठे आहेत पवार साहेब काय म्हणाले पवार साहेबांचं म्हणणं काय अशी चर्चा सुरु होतात एकूणच देशाचं राजकारण शरदचंद्रजी पवार साहेबांच्या अवतीभोवतीच फिरताना पाहिल आहे, असे व्यक्तिमत्व जगामध्ये एकमेव आहे असं म्हटलं तरी वाव वाटायला नको...



## पवार कुटुंबीयांची ओळख

■ पवार कुटुंबीयांची ओळख एकोप्याची म्हणून ओळखले जाते परंतु मध्यंतरी पवार कुटुंबीय दुरावले तरीदेखील कुणालाच विश्वास बसेना की पवार कुटुंबीय विभागले असेल किंवा दुरावले असेल कारण की कोणताही कार्यक्रम असला की त्या ठिकाणी पवार कुटुंब एकत्र दिसत मग पवार कुटुंबीय खरंच विभागलं आहे का ? असाही प्रश्न अनेकांना पडला आहे. पण तो विचार करण्यापेक्षा पवार कुटुंबीय एकत्र का राहते आणि कशामुळे राहते आणि एकत्र राहण्याचे फायदे किती आहेत हे जर समजून घेतलं आणि त्यांच्यासारखं वागायला चालू केलं तर देशाला नवीन दिशा मिळेल यात शंका नाही हा विचार करणे महत्वाचे आहे..






देश पातळी पासून गाव पातळी पर्यंत लहान मोठ्या गोष्टींची जाण असणारा जगातील एकमेव नेता पवारसाहेब

राजकारणातील वस्ताद म्हणून ज्यांच्याकडे पाहिलं जातं असे शरदचंद्रजी पवार साहेब

भारत देश कृषी प्रधान आहे पण ही ओळख शरदचंद्रजी पवार साहेबांमुळेच आहे..

ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर म्हणतात जिथे आपली बुद्धी बंद पडते तिथून पुढे शरद पवारांची बुद्धी सुरू होते...

देशातील सर्वच राजकीय पक्षाशी जवळचे संबंध ठेवून देशाच्या विकासासाठी काम करणारे एकमेव नेतृत्व म्हणजे पवारसाहेब



**थोर** विचारवंत, महापुरुष, प्रबोधनकार, शेतकरी, कष्टकरी, संतश्रेष्ठांच्या विचारातून प्रभावी होऊन सध्याच्या काळात पुढच्या दहा वर्षांचा विचार करून सर्व गोष्टीच अवलोकन करत त्यावर विचार करून कृती करणार एकमेव नेतृत्व, महाराष्ट्रातच नव्हे तर देशात प्रसिद्ध असलेले तेल लावलेला पहिलवान म्हणून ज्यांची ओळख कधीच आखाड्यात न उतरता वस्ताद की मिळवली आणि राजकारणाच्या आखाड्यातील एकमेव वस्ताद अन् विचाराचा वटवृक्ष म्हणून ज्यांच्याकडे पाहिलं जात असे शरदचंद्रजी पवार साहेब... राजकारणच नव्हे तर क्षेत्र कोणतेही असो त्या क्षेत्रातील पूर्णपणे माहिती असणार एकमेव नेतृत्व म्हणून शरदचंद्रजी पवार साहेबांकडे पाहिलं जातो मग शेती असो, राजकारण असो, शिक्षण क्षेत्र असो, धार्मिक क्षेत्र असो, सामाजिक क्षेत्र असो, आरोग्य क्षेत्र असो कोणत्याही क्षेत्रातील व्यक्ती त्यांना भेटला तरी त्या क्षेत्रातील अधिक माहिती पवार साहेबांकडेच आहे असं त्यांना भेटणारा व्यक्तीच सांगतो कारण की पवार साहेबांना भेटल्यानंतर जेवढी माहिती त्या क्षेत्रातील संबंधित व्यक्तीला नसती त्यापेक्षा अधिक माहिती देतात आणि त्या क्षेत्रासंबंधीत प्रश्न शरद पवार त्यांना विचारतात त्यांना उत्तर नाही आलं तर स्वत: उत्तर देतात आणि त्यांना समजून सांगतात म्हणूनच त्यांना प्रत्येक क्षेत्रातील वस्ताद म्हटलं जातं...

## अशक्य ते शक्य करणारे पवार साहेब


सर्वप्रथम एक सांगणं महत्वाचं ठरणार आहे ते म्हणजे कॅन्सर सर्वात मोठा आणि भयान आजार आहे या आजारात गेलेला माणूस बाहेर येईल असं होत नाही परंतु अशा गंभीर आजाराला सुद्धा हरवलं आणि पुन्हा जनतेच्या सेवेत रुजू होणारे एकमेव पवार साहेब आहेत. आज कॅन्सर ग्रस्त लोकांना पवार साहेबांचे उदाहरण देऊन त्यांना मोटिवेशन करण्याचं काम सुद्धा डॉक्टर्स करतात. नवे नवे तर कॅन्सर ग्रस्त असतानाचे व्हिडिओ पाहून अनेक रुग्ण ठीक सुद्धा होताना दिसत आहेत.. तो म्हणजे उपचारापेक्षा मोटिवेशन करणं खूप महत्वाचा आहे तेच मोटिवेशन पवार साहेबांच्या माध्यमातून होतय आणि आजारावर मात करण्याची ताकद रुग्णांमध्ये निर्माण होते म्हणूनच प्रत्येक क्षेत्रातील वस्ताद म्हणून पवार साहेबांना ओळखलं जातं.. अशक्य ते शक्य करणारे पवार साहेब आज सर्वांनाच प्रेरणादायी ठरत आहेत..

## राष्ट्रपती प्रधानमंत्री नसतानाही जगाला माहित असलेला एकमेव नेता

■ स्वत:चं कर्तुत्व असं सिद्ध करा की कोणत्याच मोठ्या पदावर नसतानाही आपल्याला लोकांनी ओळखलं पाहिजे. हेच ध्येय जणू उराशी बाळगून काम केलं आहे, असं कर्तुत्व शरदचंद्रजी पवार साहेबांनी सिद्ध करून दाखवलं आहे. राष्ट्रपती प्रधानमंत्री यापैकी कोणतेही पद पवार साहेबांकडे आतापर्यंत आलेल नाही तरी देखील जगामध्ये त्यांना ओळखलं जातं यावरून असं लक्षात येतं की कर्तुत्व सिद्ध करताना कोणतेही पद नसले तरी चालेल पण काम असं करा की आपल्याला साऱ्या जगाने ओळखलं पाहिजे तेच काम पवार साहेबांनी केलं आणि अख्ख जग त्यांना आज ओळखत आहे त्यांचं कर्तुत्व त्यांची ओळख बनल आहे...



# शरद पवार म्हणजे विचाराचा वटवृक्ष अन् वैचारिक आखाड्यातील वस्ताद



## तरुणाईला प्रेरणा देणार 84 वयाच तरुण व्यक्तिमत्व !

■ सध्याच्या काळामध्ये 18,20,25,30 वयाची मुलं जे धाडस करत नाहीत तेच धाडस 84 वयाचा तरुण करतोय आणि तरुणाईला प्रेरणा देतोय.. जी गोष्ट 18,20,25,30 वयात असताना करायला हवी तीच गोष्ट 84 वय झालं असताना देखील करणार जगातले एकमेव व्यक्तिमत्व म्हणून पवार साहेबांकडे पाहिलं जात आहे. देशातील तरुणाईला आदर्श ठरणार व्यक्तिमत्व म्हणून पवार साहेबांकडे पाहिले जाते. एखादी गोष्ट मुलांकडून चुकली किंवा करता नाही आली तर पवार साहेबांचा आदर्श घ्या 84 वयाचा माणूस सुद्धा करतोय तुला काय होतं करायला असे उदाहरण आई-वडील मुलांना देतात असं व्यक्तिमत्व पुन्हा मिळणे नाही..

**सामाजिक, राजकीय, धार्मिक, शेती, शैक्षणिक सर्व क्षेत्राचा शेंड्यापासून बुडापर्यंत परिपूर्ण अभ्यास असणार एकमेव नेतृत्व म्हणजे शरदचंद्रजी पवार साहेब**

## शिक्षण अन् शेती म्हणजे अति महत्वाचे विषय

■ कर्मवीर भाऊराव पाटलांनी सुरू केलेल्या शिक्षण संस्थांचे आज वटवृक्ष होताना दिसत आहे ते वटवृक्ष इतक्या सहजासहजी मोठे झाले नाही तर त्याला खत पाणी घातलय ते शरदचंद्रजी पवार साहेबांनी तिच्या प्रयत्नांमुळे शिक्षण क्षेत्राला उभारी मिळाली तसेच शेती क्षेत्राविषयी देखील तितकच गांभीर्याने त्यांनी घेतलं आणि शेतीला चांगले दिवस आले आहेत. ती करण्याची पद्धत तिथून उत्पन्न घेण्याची पद्धत ही सुद्धा जगासमोर आणून दाखवली आहे. भारताला कृषी प्रधान देश म्हणून ओळखलं जातं परंतु हे आपल्याला बारामती मध्ये गेल्यानंतरच कळतं की भारताला कृषिप्रधान देश का म्हटलं जातं... एकूणच शिक्षण आणि कृषी क्षेत्रावर साहेबांचं विशेष लक्ष असल्याने त्या दोन्ही क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत.




## क्षेत्र कोणतेही असो त्या ठिकाणी पवार साहेबांचे नाव येतच !

■ राजकारणातील अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून पवार साहेबांकडे पाहिलं जातं. कृषी क्षेत्र असेल, राजकीय क्षेत्र असेल, धार्मिक क्षेत्र असेल, क्रीडाक्षेत्र असेल, सामाजिक क्षेत्र असेल कोणत्याही क्षेत्रात जाल त्या ठिकाणी पवार साहेबांचं नाव आदरणीय घेतलं जातं कारण की प्रत्येक क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य केलं आहे करत आहेत आणि त्यांच्यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळत आहे, असं व्यक्तिमत्व पुन्हा होणे नाही म्हणूनच प्रत्येक क्षेत्रातील वस्ताद म्हणून पवार साहेबांकडे पाहिलं जातं. क्षेत्र कोणतेही असो त्या ठिकाणी पवार साहेबांचं नाव आल्याशिवाय ते क्षेत्र पूर्ण होत नाही, त्यांनी प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांची वेगळी ओळख निर्माण केली आहे आणि तसं कामही केला आहे..



■ प्रा. सचिन पवार / प्रा. ऋतुजा पवार. मो .9921801919

## सत्ताधारी पक्षालाही संकटात पवार साहेबांची आठवण येते

■ किल्लारीच्या भूकंपानंतर पवार साहेबांनी ज्या पद्धतीने ती प्रकरण हाताळलं आणि त्या नागरिकांना ज्या पद्धतीने आधार दिला. त्यांच्यातील ते कौशल्य पाहून सत्ताधारी देखील ज्या ज्या वेळेस मोठाली संकट येतात त्या त्या वेळेस पवार साहेबांची आठवण काढतात आणि त्यांना त्या संकटातून बाहेर पडायचे मार्ग विचारतात एवढेच नव्हे तर त्या ठिकाणी त्यांना महत्वाची भूमिका देऊन या संकटातून बाहेर काढण्याची विनंती देखील करतात असे व्यक्तिमत्व पुन्हा देशाला मिळणे कठीण आहे. विरोधकांनाही हेवा वाटेल असं व्यक्तिमत्व म्हणजे शरदचंद्रजी पवार साहेब...



हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक सचिन मनोहर पवार, यांनी मिनाक्षी प्रिंट्स, कुसळंब ता.पाटोदा जि.बीड – ४१३२०७ येथे छापून साप्ताहिक दिव्यवास्तव कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज चौक कुसळंब, ता.पाटोदा जि.बीड – ४१३२०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे.संपादक सचिन मनोहर पवार मो.९९२१८०१९१९, Email.divyavastav19gmail.com
THIS NEWSPAPERS IS PRINTED,PUBLISHER,OWNED BY SACHIN MANOHAR PAWAR, AT Meenakshi PRINTERS ,KUSLAMB TQ.PATODA DIST.BEED AND PUBLISHED AT THE OFFICE WEEKLY DIVYA VASTAV, CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ CHOWK KUSLAMB, TQ.PATODA DIST.BEED - 413207(MAHARSTHRA).Mob.9921801919, Email.divyavastav19gmail.com